# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### राज्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत

**(१) २७२२४ (०६-०८-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनांच्या अनुदानात वाढ करण्याच्या शासनाच्या विचाराधीन बाबीवर निर्णय घेण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच राज्यातील कुष्ठपिडीत, ज्येष्ठ नागरीक, क्षयरोगग्रस्त, कर्करोगग्रस्त, आदिवासींना पुरेशा प्रमाणात मदत देण्यासंदर्भात शासनाने कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०२-२०१८) :** (१), (२) व (३) विशेष सहाय्य कार्यक्रमाअंतर्गतच्या संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजनांच्या अनुदान वाढ करण्याची बाब शासनाच्या विचारधीन असून याबाबत कार्यवाही चालू आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्राप्त माहितीनुसार कुष्ठरोगग्रस्त व्यक्तींकरिता पुढीलप्रमाणे विविध उपाययोजनादेखील राबविण्यात येतात.

अ) १३ रुग्णालयीन व १६ पुनर्वसन तत्त्वावर कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना अनुक्रमे रु. २२००/- व रु. २०००/- प्रति रुग्ण प्रतिमाह मदत देण्यात येते.

आ) विकृती असलेल्या कुष्ठरुग्णांस पुनर्रचनात्मक शस्त्रक्रियेसाठी रु. ८०००/- अनुदान देण्यात येते.

इ) कुष्ठवसाहतीत राहणाऱ्या व जखमा असणाऱ्या रुग्णांच्या जखमांवर ड्रेसिंग करण्यासाठी ड्रेसरला रुग्णसंख्येनुसार रु. २०००/-, रु. ४०००/-, व रु. ५०००/- प्रतिमाह मानधन देण्यात येते.

ई) गरजू कुष्ठरुग्णांस एम.सी.आर. चप्पल, गॉगल्स, स्प्लिट्स, सेल्फ केअर किट हे साहित्य मोफत पुरविले जाते.

---

**दादर (पूर्व) मुंबई येथील इंडियन एज्युकेशन सोसायटी संचालित पदमाकर ढमढेरे या शाळा व्यवस्थापनाने, इंग्रजी माध्यम प्राथमिक वर्गाची मनमानी शुल्कवाढ केल्याबाबत.**

**(२) ५४७९४ (२२-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (पूर्व) मुंबई येथील इंडियन एज्युकेशन सोसायटी संचालित पदमाकर ढमढेरे या शाळा व्यवस्थापनाने, इंग्रजी माध्यम प्राथमिक वर्गाची मनमानी शुल्कवाढ केल्या प्रकरणी, शिक्षण उपसंचालक यांनी, गत तीन वर्षातील लेखा परीक्षण अहवाल सादर करण्याचे तसेच शुल्क वाढीस स्थगिती देवून चौकशीचे आदेश दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शाळा व्यवस्थापनाकडून मुदत न देता, संपूर्ण वर्षाची फी एक रक्कमी घेणे, युनिफॉर्म शाळेने नेमून दिलेल्या दुकानातूनच घेणे, वहया, पुस्तके शाळेतूनच घेणे आदी पालकांवर सक्ती करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, व्यवस्थापनाने शाळेच्या मैदानावर अतिक्रमण करुन, बांधलेले वाढीव वर्ग हे एसएससी बोर्डाच्या मराठी व इंग्रजी शाळांना न देता सीबीएसई शाळांसाठी देण्यात येणे, सीबीएसईच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारातून प्रवेश खुला करुन, या प्रवेशद्वारातून एसएससीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश बंद करुन, प्रचलित संस्था चालक आणि व्यवस्थापन अधिकारी मराठी विद्यार्थ्यांवर अन्याय करीत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार शासनाने संस्थेविरुध्द कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

मुंबईतील दादर (पुर्व) येथील इंडियन एज्युकेशन सोसायटी संचलित पदमाकर ढमढेरे या शाळा व्यवस्थापनाने शैक्षणिक शुल्कामध्ये दुप्पट वाढ केल्याप्रकरणी इ.१ ली च्या विद्यार्थ्यांच्या पालकांकडून तक्रार करण्यात आली होती. त्याअनुषंगाने उपशिक्षणाधिकारी (खा.प्रा.) यांनी दिनांक २४.४.२०१६ च्या पत्रान्वये मागील ३ वर्षाचे लेखा अहवाल सादर करण्याचे व तसेच पुढील आदेश प्राप्त होत नाही तोपर्यंत इ.१ ली च्या शैक्षणिक शुल्कात कोणतीही वाढ करण्यात येऊ नये, असे शाळा व्यवस्थापनास कळविले आहे.

(२) याबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) सदर शाळेच्या संकुलात सीबीएसई अभ्यासक्रमाचे कोणतेही वर्ग चालविले जात नाहीत. शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारातून एसएससी चे विद्यार्थी या प्रवेशद्वारातून शाळेत ये-जा करतात. संकुलातील शाळांमध्ये शिकणारे बहुतांशी विद्यार्थी मराठी आहेत. मराठी विद्यार्थ्यांवर कोणताही अन्याय केला जात नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## "खाशाबा जाधव करंडक" कुस्ती स्पर्धेसाठी अनुदानाची रक्कम कमी केल्याबाबत

**(३) ६००३७ (२२-०८-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासन अनुदान प्राप्त असलेल्या व शासनाच्या वतीने खेळविण्यात येणाऱ्या "खाशाबा जाधव करंडक" कुस्ती स्पर्धेसाठी अनुदानाची रक्कम कमी करुन कुस्तीविरांना नाऊमेद करीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आंतरराष्ट्रीय कुस्ती महासंघाचे नियम सर्वत्र बंधनकारक असुनही त्याची अंमलबजावणी आयोजकांकडून केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वजनी गटांची संख्या सातवरुन आठ केल्याचे पत्र क्रिडा संचालनालयाकडे दिल्यानंतर पुढे मान्यतेसाठी पाठवूनही त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, कुस्ती स्पर्धेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०२-२०१८) :** (१) नाही. स्व.खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी रु. ५० लक्ष इतका निधी उपलब्ध करून दिला जातो.
(२), (३) व (४) आंतराष्ट्रीय कुस्ती महासंघाच्या नियमावलीनुसार कुस्ती स्पर्धेत सहभागी वजनी गटांची संख्या ७ ऐवजी १० वजन गट अशी सुधारित करण्याबाबतचा प्रस्ताव तपासण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मानीव अभिहस्तांतरणासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची संख्या कमी करण्याबाबत

**(४) ६०५१८ (२९-०८-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १ लक्ष सहकारी गृहरचना संस्था असून केवळ ५ टक्के गृहरचना संस्थांच्या जागा त्यांच्या नावावर झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मानीव अभिहस्तांतरणासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची संख्या कमी करून अभिहस्तांतरण प्रक्रिया सोपी करणे तसेच राज्यात RERA कायदा लागू करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.गृहनिर्माण मंत्री यांना माहे जून, २०१६ वा त्या दरम्यान निवेदन दिले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, अभीहस्तांतरण दस्त नोंदणी करण्यासाठी ३० हजार रुपये तसेच दस्त व संबंधित कागदपत्रांचे प्रत्येक पान स्कॅन करण्यासाठी २० रुपये खर्च येत असल्याने १० ते ५० सदनिकांच्या गृहरचना संस्था मानीव अभीहस्तांतरण करण्यास टाळाटाळ करत असल्याने नाममात्र शुल्क आकारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१२-०३-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अभिहस्तांतरण दस्त नोंदणी करण्यासाठी सरसकटपणे रुपये ३० हजार इतकी नोंदणी फी आकारली जात नसून नोंदणी फी तक्त्यातील अनुच्छेद १(४) (अ) नुसार १% परंतु जास्तीत जास्त रु.३०,०००/- या मर्यादेत नोंदणी फी आकारली जाते.

महसुल व वन विभाग, शासन निर्णय दि.२०.०८.२००१ अन्वये संगणकीकरणाचा खाजगीकरणाच्या माध्यमातून येणारा खर्च भागविण्यासाठी दस्त हाताळणी शुल्क म्हणून प्रतिपान रु.२०/- मात्र ऐवढा आकारण्याची परवानगी देण्यात आलेली होती. परंतु जुलै, २०१५ मध्ये बीओटी संस्थेची मुदत संपल्यामुळे , नोंदणी व मुद्रांक विभागाकडून राबविण्याकरीता व त्यांच्या कडून देण्यात येणाऱ्या विविध ई-सेवाकरिता नोंदणी फी सोबत रु.२०/- प्रतिपान एवढे दस्त हाताळणी शुल्क यापुढेही आकारण्यास महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.०८.१०.२०१५ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुनाडा (ता.भद्रावती, जि.चंद्रपुर) येथील ३० प्रकल्पग्रस्त उमेदवारांचे प्रस्ताव नागपुर येथील मुख्य कार्यालयात न पाठविल्याबाबत

**(५) ६२६१४ (१५-०५-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुनाडा (ता.भद्रावती, जि.चंद्रपुर) येथील जवळपास ३० प्रकल्पग्रस्त उमेदवारांचे प्रस्ताव वेकोलीच्या माजरी कुचना कार्यालयातील सूचनेनुसार संबंधित अधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक होते मात्र हे प्रस्ताव नागपुर येथील मुख्य कार्यालयाकडे न पाठविताच सन २००६ पासून त्याच कार्यालयात पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे प्रस्ताव नागपुर येथील मुख्य कार्यालयात न पाठविण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती नागपुर येथील मुख्य कार्यालयात प्रस्ताव न पाठविणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०६-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही. क्षेत्रीय महाप्रबंधक मे.वेस्टर्न कोल फिल्ड लि.माजरी क्षेत्र, जि.चंद्रपूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार जुना कुनाडा येथील ३० प्रकल्पग्रस्त उमेदवारांना रोजगार देण्याबाबत वेकोली मुख्य कार्यालय, नागपूर यांचे पत्र दिनांक २१.१०.२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच जनरल मॅनेजर वेकोली माजरी क्षेत्र यांचे पत्र क्र.WCL/GM/(L&R/९३७) दि.२३.१०.२०१५ अन्वये जुना कुनाडा येथील ३० प्रकल्प ग्रस्त उमेदवारांनी ९% व्याजासह मोबदला रक्कम परत करण्याच्याअटीवर रोजगार देण्याचे आदेश निर्गमित केले असल्याचे कळविले आहे.

(२) मे.वेस्टर्न कोल फिल्ड लि. मुख्य कार्यालय, नागपूर येथे रोजगार प्रस्ताव सादर करण्यात आलेले असून कुनाडा येथील १५ प्रकल्पग्रस्त उमेदवारांना रोजगार देण्यात आलेले आहे, व ०१ प्रकरण वेकोली मुख्य कार्यालय, नागपूर येथे दाखल आहे. तसेच नामनिर्देशीत व्यक्ती पात्र नसल्याचे एकूण ०४ प्रकरणे आहेत व एकूण १० प्रकरणात उमेदवारानी अर्ज सादर केलेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समितीकडून टिनशेडवर ९० लाख खर्च करुनही टिनशेड दिड वर्षात नादुरुस्त झाल्याबाबत**

**(६) ६५२३९ (२७-०१-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समितीकडून टिनशेडवर ९० लाख खर्च करुनही टिनशेड दिड वर्षात नादुरुस्त झाल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समितीकडून बांधकाम व दुरुस्तीच्या नावाखाली पैशाचा अपव्यय सुरु असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१६-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

दि.५.६.२०१६ रोजी हिंगोली शहर व परिसरात झालेल्या भिषण चक्रीवादळाने (नैसर्गिक आपत्तीने) टिनशेडचा काही भाग कोसळलेला होता.

(२) हे खरे नाही.

भिषण चक्रीवादळाने टिन शेडचा कोसळलेला भाग ई-निविदा मागवून दुरूस्त करण्यात आला आहे. तसेच चक्री-वादळाने झालेल्या नुकसानीबाबत पंचनामा करून, जिल्हाधिकारी यांच्याकडे नुकसान भरपाईची मागणी करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव जिल्हयातील नायब तहसिलदारांनी सातबारा संगणकीकरणात दिरंगाई केल्यामुळे कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्याबाबत**

**(७) ७५७३६ (१२-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयातील आठ नायब तहसिलदारांना सातबारा संगणकीकरणात दिरंगाई केल्यामुळे कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सातबारा संगणकीकरणाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०३-२०१८) :** (१) जळगाव जिल्हयातील सात डी.बी.ए. तथा नायब तहसिलदार यांना एडिट मोडयुल या आज्ञावलीमध्ये कमी कामकाज असल्यामुळे कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली होती.

(२) व (३) दिनांक २७/१२/२०१६ ते ६/५/२०१७ या कालावधीत जळगांव जिल्हयात गा.न.नं. ७/१२ संगणकीकरणाचे काम चांगल्या वेगाने पूर्ण करण्यात आल्याने डी.बी.ए. तथा नायब तहसिलदार यांचे खुलासे मान्य करण्यात येऊन त्यांचे विरुध्दच्या कारवाईची संचिका नस्तीबध्द करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**आम आदमी विमा योजना तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहचण्याबाबत**

**(८) ७६२८० (१४-०४-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने ग्रामीण भागातील पाच एकर आतील अल्पभूधारक शेतकरी वर्गासाठी अपघात विमा म्हणून (आम आदमी विमा) योजना सन २००७ पासून सुरु केली आहे तसेच राज्य व केंद्र शासनाने राज्यातील शेतकऱ्यांसाठी अनेक योजना आणल्या आहेत परंतू या योजना गोरगरीब शेतक-यांपर्यत पोहोचत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आम आदमी विमा योजनेची माहिती सर्वच अल्पभूधारक शेतकऱ्यांना माहिती व्हावी यासाठी कृषि सहाय्यक, तलाठी, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका यांच्याकडे जबाबदारी दिली आहे परंतू यापैकी बहुतांशी कर्मचाऱ्यांनी या योजनेची माहिती शेतकऱ्यांना न दिल्याने या योजनेचा फायदा शेतकऱ्यांना होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील शेतकऱ्यांना मिळणारे अपघात विमा संबंधी प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले असून यामध्ये एकट्या सिंधुदुर्ग जिल्हयातून दाखल झालेल्या ६७ प्रस्तावांपैकी फक्त १४ प्रस्ताव मंजूर झाले असून सुमारे ४१ प्रस्ताव प्रलंबित असल्याचे समजते, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, या प्रलंबित प्रस्तावांच्या कागदपत्रांची लवकरात लवकर पूर्तता करून शेतकऱ्यांना अपघात विमा मिळण्यासाठी तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती गरजू व सामान्य शेतकऱ्यांपर्यत पोहचण्यासाठी शासनाने कोणती प्रभावी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

आम आदमी विमा योजना सन २००७ पासून राबविण्यात येत असून या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांचा शोध संबधीत तलाठी यांनी घ्यावयाचा आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) केंद्र शासनाच्या आम आदमी विमा योजनेअंतर्गत सिंधुदूर्ग जिल्हयातून एकूण ३९९ प्रस्ताव भारतीय आयुर्विमा महामंडळ, सातारा यांचेकडे पाठविलेले होते. त्यापैकी २९१ प्रस्ताव मंजूर करुन, सदर रक्कम संबंधित अर्जदार यांच्या बँक खात्यात परस्पर भारतीय आयुर्विमा महामंडळ, यांचेकडून जमा केलेली आहे. उर्वरीत प्रस्तावांपैकी १८ प्रस्ताव नामंजूर झालेले आहेत, १३ प्रस्तावामध्ये त्रुटी आढळून आलेल्या आहेत व त्यांची पुर्तता करण्यात येत आहे. तसेच ७७ प्रस्ताव भारतीय आयुर्विमा महामंडळ यांचेकडे प्रलंबित आहेत. प्रलंबित प्रस्ताव तातडीने निकाली काढणेबाबत आवश्यक त्या सूचना संबधीतांना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच आम आदमी विमा योजनेच्या माहिती/प्रसार/प्रसिध्दीकरिता फलक लावणे, दवंडी देणे, विविध माध्यमांद्वारे प्रसिध्दी देणे यांचा वापर करण्यात येतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सुरु केलेल्या आम आदमी मोफत**
**विमा योजनेच्या प्रसार व प्रचाराबाबत**

**(९) ७७७१२ (२०-०४-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील शासनाच्या आम आदमी विमा योजनेअंतर्गत विमाधारक पालकांचे पाल्य हे शाळा मुख्याध्यापक व शिक्षकांच्या उदासिनतेमुळे शालेय शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याचे दिनांक २१ डिसेंबर २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सन २००७ पासून शालेय विद्यार्थ्यांसाठी आम आदमी मोफत विमा योजना सुरु केली असून शासन या योजनेसाठी एलआयसीला दरवर्षी रूपये २५ कोटी भरत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खेड तालुक्यामध्ये ९० शाळांमधून ९ वी ते १२ वी दरम्यान १० हजाराहून अधिक विद्यार्थी शिकत असताना २७५ फॉर्म या योजनेत भरले गेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने आम आदमी मोफत विमा योजनेचा प्रसार व प्रचार करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
आम आदमी विमा योजनेअंतर्गत भारतीय आयुर्विमा महामंडळाकडून लाभार्थींच्या संख्येनुसार विमा हप्त्याची मागणी करण्यात येते. त्यानुसार महामंडळाला निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.
(३) सन २०१६ मध्ये आम आदमी विमा योजनेअंतर्गत खेड तालुक्यामध्ये शालेय शिष्यवृत्तीचे एकूण ३४३ फॉर्म भरले आहेत.
(४) आम आदमी विमा योजनेच्या माहिती/ प्रसार / प्रसिध्दीकरीता फलक लावणे, दवंडी देणे, विहित माध्यमांव्दारे प्रसिध्दी देणे याचा वापर करण्यात येतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विकास विभागाची बनावट वेबसाईट तयार करुन आदिवासी आश्रमशाळेत प्राथमिक शिक्षकांना नोकरी देण्याचे आमिष दाखवून शेकडो उमेदवारांना कोट्यावधी रुपयांना फसवल्याबाबत**

**(१०) ७७९३२ (२८-११-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाचे बनावट संकेतस्थळ तयार करुन आदिवासी आश्रमशाळेत प्राथमिक शिक्षक म्हणून नोकरी देण्याचे आमिष दाखवून शेकडो उमेदवारांना कोट्यावधी रुपयांना फसवल्याची घटना माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व बनावट संकेतस्थळ तयार करुन कोट्यावधी रुपयांची लूट करणाऱ्या टोळीस पकडण्यात आले आहे काय व त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(३) अद्याप सदर प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली नसल्यास, चौकशीची व कारवाईची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०३-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) होय. याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा युनिट-२ नाशिक शहर,नाशिक यांनी ७ आरोपींना अटक केली आहे. सदर आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दि.०३ ऑगस्ट, २०१७ रोजी दोषारोप दाखल केले असून कोर्ट केस नं.१२९३/१७ आहे. या ७ आरोपींना मा.न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. सद्यस्थितीत आरोपी जामिनावर असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**पालघर जिल्हयातील वसई परिमंडळाअंतर्गत महावितरण कंपनीची कर्मचाऱ्यांची पदे वाढविण्याबाबत**

**(११) ७८४२४ (२८-०४-२०१७). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील वसई परिमंडळातंर्गत महावितरण कंपनीस २००० कर्मचारी मंजूर असुन सुमारे ५०० कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे तातडीने भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजीच्या निवेदनाद्वारे मा.ऊर्जामंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सद्यस्थिती काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०३-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे. पालघर जिल्ह्यातील वसई परिमंडळांतर्गत १३२३ एवढी पदे मंजूर असून त्यापैकी दि. ०५.०२.२०१८ रोजी ३०४ पदे रिक्त होती.
(२) स्थानिक लोकप्रतिनिधींचे दि. २२.०३.२०१६ चे पत्र प्राप्त झाले आहे.
(३) व (४) रिक्त पदे भरण्याबाबत वेळोवेळी कामाची निकड व आर्थिक स्थिती विचारात घेऊन पदे भरण्याबाबतची विहित कार्यवाही महावितरण कंपनीकडून करण्यात येते.

---

## चेक डॅम हया शिर्षाअंतर्गत प्रकल्प कार्यालय पुसद येथे देण्यात आलेला निधी अखर्चीत असल्याबाबत

**(१२) ८३३०६ (१८-०४-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय पुसद येथे चेक डॅम या शिर्षाअंतर्गत त्या भागातील आदिवासी जनतेला सिचंनाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्या म्हणुन सन २०१२ पासून ते २०१५ पर्यंत एक कोटी पंच्चावन्न लक्ष निधी देण्यात आला असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी विकास विभागाकडून प्रकल्प कार्यालयाला तेथील आदिवासीच्या विकासासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात निधी देण्यात येतो मात्र प्रकल्प कार्यालय पुसद यांने चेक डॅम या शिर्षाअंतर्गत मिळालेला निधी खर्च केला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार निधी अखर्चीत ठेवणाऱ्या अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१९-०३-२०१८) :** (१)विशेष कैंद्रिय सहाय्य व भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१) अंतर्गत सन २०१२-१३ ते २०१५ पर्यंत विविध योजनेकरिता रु.१६६.२० लक्ष निधी कैंद्र शासनाकडून प्राप्त झाला आहे.
(२), (३) व (४) पुसद कार्यालयास सिंचनासाठी रु.१३७.२० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणातील अंमलबजावणी यंत्रणा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यवतमाळ व कार्यकारी अभियंता ल.पा. जिल्हा परिषद यवतमाळ यांना सिंमेट प्लग बंधारे/चेक डॅम योजनेचे अंदाजपत्रके व आराखडे तात्काळ सादर करण्याबाबत कळविलेले आहे. याकामी पाठपुरावा सुरु असून अंदाजपत्रके प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**गोवेली ग्रामीण शाखा कार्यालयाचे विभाजन करून अनुक्रमे गोवेली शाखा व म्हारळ शाखा कार्यालयाच्या निर्मिती प्रस्तावाबाबत**

**(१३) ८४३४८ (२८-०४-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीज थकबाकी वसुली प्रभावीपणे करण्यासाठी गोवेली ग्रामीण शाखा कार्यालयाचे म्हारळ नागरी शाखा व नवीन गोवेली ग्रामीण शाखा कार्यालयाच्या निर्मितीचा प्रस्ताव संपूर्ण शिफारशीसह कार्यकारी अभियंता, कल्याण ग्रामीण विभाग, कल्याण यांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये शासनास सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकप्रतीनिधींनी सदर प्रस्तावाचा पाठपुरावा माहे जानेवारी, २०१६ पासून केला असून ग्रामीण भागातील वीज ग्राहकांच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करून शासनास सादर केलेला सदरच्या महत्वाच्या प्रस्तावावर शासनाकडून अद्यापही निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त लोकहिताच्या प्रस्तावाला मंजुरी मिळण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-०३-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) गोवेली ग्रामीण शाखा कार्यालयाचे विभाजन करुन अनुक्रमे गोवेली शाखा व म्हारळ शाखा कार्यालयांची निर्मिती केल्यास मूळ गोवेली शाखा कार्यालयाच्या आस्थापनेवर शाखा कार्यालय निर्मितीसाठी निश्चित केलेल्या मानकापेक्षा ५०० वीज ग्राहकांची संख्या कमी आहे. तसेच, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने आर्थिक वर्ष २०१६-१७ ते २०१९-२० या नियंत्रण कालावधीकरीता दि. ०३.११.२०१६ रोजी जारी केलेल्या बहुउद्देशिय वीज दर आदेशान्वये रु. १०,६६१ कोटीने संचलन व सुव्यवस्था खर्च कमी मंजूर केला आहे. त्यामुळे गोवेली शाखा कार्यालयाचे विभाजन करुन नवीन म्हारळ शाखा कार्यालय निर्माण करणे सद्यस्थितीत शक्य नाही. तथापि, महावितरण कंपनीने नवीन कार्यालय निर्मितीची मानके निश्चित करण्यासाठी नव्याने प्रक्रिया सुरु केलेली आहे. नवीन मानके प्रस्तुत केल्यानंतर वरील प्रस्तावासंदर्भातील आर्थिक दायित्व विचारात घेऊन धोरणात्मक निर्णय घेणे शक्य असल्यास उपरोक्त प्रस्तावाबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.

---

**केंद्र शासनाच्या अपंग अधिकार कायद्यांतर्गत राज्यात अपंग धोरण जाहीर करुन अपंगांचा सर्वांगिण विकास करण्याबाबत**

**(१४) ८५३४७ (१८-०८-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या अपंग अधिकार कायद्यांतर्गत राज्यातील अपंगांच्या कल्याणासाठी राज्य शासनाने धोरण आणले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपंग धोरणातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) तसेच अपंगांच्या सर्वांगिण विकासासाठी उपाययोजना तयार करुन सदर प्रकरणी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२६-०२-२०१८) :** (१), (२) व (३) अपंगाच्या सर्वांगिण विकासाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याच्या अपंग कल्याण धोरणाचा मसुदा तयार करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या अपंग व्यक्तींचे हक्क अधिनियम, २०१६ या नवीन कायदयातील तरतूदीनुसार सदर अपंग धोरणाच्या मसुदयामध्ये सुधारणा करुन या मसुदयाबाबत नागरिकांकडून सुचना प्राप्त करुन घेतलेल्या आहेत तसेच संबंधित प्रशासकीय विभागांकडून अभिप्राय प्राप्त करुन घेऊन वित्त विभागाच्या अभिप्रायार्थ धोरणाचा मसूदा सादर करण्यात आलेला आहे. वित्त विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर प्रस्तुत अपंग कल्याण धोरणांच्या मसुदयास मान्यता मिळण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सदयस्थितीत अपंग कल्याण विषयक विविध योजना सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येत आहेत त्याचप्रमाणे इतरही प्रशासकीय विभागामार्फत अपंग कल्याण विषयक त्यांच्याशी संबंधित योजना राबविण्यात येतात.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील दिव्यांग शाळांच्या केलेल्या तपासणी अहवालात गंभीर त्रुटी असल्याबाबत

**(१५) ८६१७१ (१८-०८-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हा व शहरातील दिव्यांग शाळांच्या केलेल्या तपासणी अहवालात १२ शाळांमध्ये गंभीर त्रुटी असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शाळांची नावे काय आहेत व त्यामध्ये कोणकोणत्या त्रुटी निदर्शनास आल्या,
(३) असल्यास, या शाळांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०२-२०१८) :** (१) होय.
(२) तपासणीमध्ये त्रुटी आढळून आलेल्या १२ शाळा खालीलप्रमाणे आहेत :-

(१) राजे दिलीपसिंह ज.घाटगे स्मृती निवासी कर्णबधीर विद्यालय, ता.कागल, जि.कोल्हापूर (२) सावित्रीबाई फुले मतिमंद विद्यालय, एकोंडी, ता.कागल, जि.कोल्हापूर. (३) स्वर्गीय गणपतराव गाताडे निवासी मतिमंद विद्यालय, ता.कागल, जि.कोल्हापूर. (४) निवासी मूकबधीर विद्यालय, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर. (५) चैतन्य अपंग मति विकास विद्यालय भडगांव, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर. (६) रत्नमाला माळी मतिमंद मुलांची शाळा, भादवण, ता.आजारा, जि.कोल्हापूर, (७) मुकबधीर निवासी शाळा, गिजवणे, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर.(८) राही पुनर्वसन केंद्र, सानेगुरुजी वसाहत, राधानगरी रोड, कोल्हापूर, (९) स्वयंम मतिमंद मुलांची शाळा, कसबा बावडा, जि.कोल्हापूर, (१०) जिज्ञासा मतिमंद मुलांची शाळा, सानेगुरुजी वसाहत,राधानगरी रोड, जि.कोल्हापूर. (११) वि.म.लोहिया मुकबधीर विद्यालय, जि.कोल्हापूर. (१२) जीवन शिक्षण मतिमंद विद्यालय, कूर, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर.

सदर अहवालात प्रामुख्याने स्वच्छता आणि व्यवस्थापनासंदर्भात त्रुटी नमूद करण्यात आल्या आहेत.

(३) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तपासणी केलेल्या एकूण ३८ शाळांपैकी ५ शाळा बंद असून ४ शाळांची अनुज्ञप्ती आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी रद्द केली आहे. २९ शाळांपैकी १७ शाळांमध्ये गंभीर स्वरुपाच्या त्रुटी आढळून आल्या नाहीत. उर्वरित १२ शाळांना आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली असून त्रुटीपूर्तता करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेंदूरजना घाट (ता.वरुड, जि.अमरावती) येथील हळदीला भाव व्यापारी व दलाल कमी देत असल्याबाबत**

**(१६) *८८०३८ (१८-०८-२०१७).* अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेंदूरजना घाट (ता.वरुड, जि.अमरावती) येथील पारंपारिक पिकांमध्ये हळदीला सर्वोच्च स्थान असून याठिकाणी हळदीचे पीक मोठ्या प्रमाणात घेण्यात येते, मात्र मागील दोन वर्षापासून हळदीचे भाव व्यापारी व दलालांकडून कमी केले असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पिकांचा कालावधी दहा महिन्यांचा असून वाढती मजुरी, किटकनाशके, रासायनिक खते आदींचे भाव वाढलेले व हळदीचा भाव घसरल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघत नसल्याने उत्पादक वर्ग चिंताग्रस्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हळदीचा वाढता खर्च लक्षात घेता किमान २० हजार रुपये अनुदान देण्याची मागणी हळद उत्पादक शेतकरी करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०९-०३-२०१८) :** (१) नाही.
या बाजार समितीमध्ये हळदीची आवक नाही.
(२) नाही.
(३) नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या नावे मागासवर्गीय मुला/मुलींच्या शैक्षणिक योजना कार्यान्वित करण्याबाबत**

**(१७) ८८४९६ (१८-०८-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मागासवर्गीय मुला/मुलींसाठी मॅट्रीकपूर्व व मॅट्रीकोत्तर शिक्षण फी व परीक्षा फी योजनेला थोर समाज सुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ह्यांचे नांव देणाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी पत्राद्वारे दिनांक ८ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास समाज कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य यांना प्रस्ताव दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दलितोद्धार व शिक्षणाविषयी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ह्यांचे समाजातील योगदान लक्षात घऊन उक्त प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (३१-०१-२०१८) :** (१) होय.
(२)सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जेष्ठ नागरीकांच्या समस्या सोडविण्याकरीता स्वतंत्र आयुक्तालय व स्वतंत्र मंत्री नेमण्याबाबत**

**(१८) ८८७७५ (०४-०९-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाळवा तालुका (जि. सांगली ) जेष्ठ नागरीक संघ समन्वय समितीच्या वतीने सांगली येथील राजारामबापू नाट्यगृहात आयोजित करण्यात आलेल्या जेष्ठांच्या मेळाव्यात राज्यातील जेष्ठ नागरीकांच्या समस्या सोडविण्याकरीता स्वतंत्र आयुक्तालय व स्वतंत्र मंत्री नेमण्याची मागणी माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, जेष्ठ नागरीकांच्या समस्या सोडविण्याकरीता स्वतंत्र आयुक्तालय व स्वतंत्र मंत्री नेमण्याबाबत अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०२-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) याबाबत शासन स्तरावर वित्त व सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घेऊन कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अपंग कल्याण विभागाच्या अधिनस्त महामंडळाकडून लाभार्थी दिव्यांगाना सवलती देणेबाबत**

**(१९) ९००६३ (१८-०८-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अपंगांच्या वित्तविषयक बाबींची परिपूर्तता करण्यासाठी राज्य अपंग कल्याण विभागाच्या अधिनस्त महामंडळाकडून लाभार्थी दिव्यांगाना विशेष अग्रक्रमाने व सवलतीच्या दरात वित्तीय कर्जाचे अनुदान एकरकमी मंजूर करण्याच्या दृष्टीने संबंधित दिव्यांग व्यावसायिकांच्या उद्योगांना अनुक्रमे रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीसाठी घरगुती, वाणिज्यिक आणि शेती व्यावसायाकरिता नाममात्र व्याजदराने कर्ज पुरवठा करण्यात यावा यासाठीची मागणी संबंधित जिल्हयाच्या दिव्यांग व्यावसायीकांकडून मा.मंत्री(अपंग कल्याण), मा.मंत्री (उद्योग), मा.राज्यमंत्री (अपंग कल्याण आणि ऊर्जा) मा.राज्यमंत्री (उद्योग) व प्रधान सचिव (उद्योग) आणि जिल्हा अपंग सहाय्यता अपंग कल्याण वित्तीय संस्था, मंडळाचे सक्षम प्राधिकारी यांच्याकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, माहे जून, २०१७ अखेरपर्यंत किती जिल्हा प्रशासनाकडून या संदर्भातील प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहेत व त्यापैकी किती प्रस्तावास तत्वतः मंजुरी प्रत्यार्पित करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-०२-२०१८) :** (१), (२) व (३) याबाबतचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.तथापि, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळामार्फत विविध योजनांअंतर्गत दि.३१.३.२०१७ अखेर एकूण १४०५० लाभार्थ्यांना एकूण रक्कम रु.११४.९१ कोटी कर्ज वाटप केले आहे.तसेच वित्तीय वर्ष २०१७-१८ मध्ये दि.३० जून, २०१७ पर्यत एकूण रु.१.२४ कोटी एवढा कर्ज निधी ७७ लाभार्थ्यांना वाटप करण्याकरीता जिल्हा कार्यालयाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती व इतर लाभांबाबत**

**(२०) ९१७८६ (१८-०८-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक श्री.झोंबाडे यांना माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निलंबित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.झोंबाडे यांना निलंबित करताना घेण्यात आलेले आक्षेप कोणते होते व त्यासंदर्भातील चौकशीच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे, त्याचबरोबर त्यांना सेवेत पुर्नस्थापित करताना लावण्यात आलेले निकषाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सन-२०१२-१३ या कालावधीत अधिकारी/कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या पदोन्नती, कालबध्द पदोन्नती, आश्वासीत प्रगती योजना व इतर पदोन्नती देण्याच्या प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार, अनियमितता झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांपैकी किती अधिकारी/कर्मचारी यांचेवर लाभ काढून घेण्याची कार्यवाही कोणाच्या आदेशान्वये केली व उर्वरित अधिकारी/कर्मचाऱ्यांचे लाभ काढून न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) मधील प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०९-०२-२०१८) :** (१) होय.

(२) श्री.झोंबाडे हे व्यवस्थापक (वित्त) या पदावर असतांना अवामी बॅकेला रु.२ कोटी बॅक दिवाळखोरीत असतांना जमा करणे, तसेच हिंगणा, नागपूर येथे शेड बाधकामात रु.८६.०० लाखाचा खर्च करुन बांधकाम अर्धवट ठेवल्याने महामंडळाचे आर्थिक नुकसान आणि महिला समृध्दी व लघुऋण वित्त योजनेअंतर्गत अधिकच्या मंजूरी देणे, हे आक्षेप श्री.झोंबाडे यांच्यावर होते.

या आक्षेपासंदर्भात सामान्य प्रशास विभाग, दि.१४.६.१९९६ च्या परिपत्रकातील तरतूदीनुसार दोषारोपाची प्रारंभिक चौकशी करुन चौकशीमध्ये कोणताही पुरावा नसल्यामुळे श्री.झोंबाडे यांचे निलंबन रद्द करुन दि.२७.३.२०१५ पासून सेवेत पुन:स्थापित केले आहे.

(३) होय.

(४) सन २०१२-१३ या कालावधीमध्ये एकूण ६७ अधिकारी/ कर्मचा-यांपैकी ५६ अधिकारी/ कर्मचारी यांचेवर लाभ काढून घेण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. उर्वरीत, अधिकारी/ कर्मचा-यांच्या पदोन्नती व इतर लाभाबाबत पुनर्विलोकन करुन कार्यवाही सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) सदर प्रकरणी व्यवस्थापकीय संचालक यांनी दोषारोपाची प्रारंभिक चौकशी करुन चौकशीमध्ये कोणताही पुरावा नसल्याने श्री.झोंबाडे यांचे निलंबन रद्द करुन दि.२७.३.२०१५ पासून सेवेत पुन:स्थापित केले आहे.

---

**राज्यातील अनुसूचित जाती व बौध्द समाजाच्या विद्यार्थ्यांना परदेशातील शिक्षणासाठी मंजूर करण्यात आलेली शिष्यवृत्ती अद्याप न मिळाल्याबाबत**

**(२१) ९२२७६ (१८-०८-२०१७). श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती महोत्सवानिमित्त सन २०१६-१७ या वर्षासाठी राज्यातील अनुसूचित जाती व बौध्द अशा ७५ विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी पाठविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली परंतु शिष्यवृत्तीचे पैसे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मिळाले नसल्याने या विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती न देण्याची कारणे काय आहेत व त्यांना शिष्यवृत्ती त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-०१-२०१८) :** (१) अंशत: होय, सन २०१६-१७ या वर्षासाठी अनुसूचित जातीच्या मुलामुलींना उच्च शिक्षणसाठी परदेश शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ६५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.

(२) व (३) ६५ विद्यार्थ्यांपैकी ६२ विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिष्यवृत्ती अदा करण्यात आली आहे. उर्वरित ३ विद्यार्थ्यांपैकी २ विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात शिष्यवृत्ती अदा करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे व १ विद्यार्थ्याची खर्चाची माहिती संबंधित विद्यार्थ्याकडून प्राप्त करुन त्यास त्यास शिष्यवृत्ती अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्हयातील तत्कालीन समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(२२) ९५१०८ (२९-१२-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील श्रीमती एस.एन.गाडेकर, तत्कालीन जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांनी गैरव्यवहार केल्याप्रकरणी मा.सामाजिक न्यायमंत्री, जिल्हा परिषद अध्यक्ष, प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण तसेच प्रधान सचिव, समाजकल्याण यांच्याकडे ९ तक्रारी दाखल केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीची दखल घेऊन दिनांक ६ फेब्रुवारी, २०१६ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्यामार्फत समिती नेमून चौकशी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशी समितीने या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन दिनांक २७ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यादरम्यान समितीने अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर अहवालात काय निष्पन्न झाले, त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-०३-२०१८) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, लातूर या कार्यालयाकडे ५ तक्रारी दाखल झाल्या आहेत.
(२) होय.
(३) होय.
(४) तत्कालीन जि.समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांच्याविरुध्द शासन ज्ञापन दि.१८.९.२०१७ अन्वये विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्हा वार्षिक आराखड्यामध्ये समाविष्ट असलेल्या विशेष घटक योजनेतील पिण्याच्या पाण्याच्या योजनांना प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत होणाऱ्या दिरंगाईबाबत**

**(२३) ९५४९१ (२९-१२-२०१७). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हा वार्षिक आराखड्यामध्ये विशेष घटक योजनेअंतर्गत मागासवर्गीय वस्त्यांकरिता सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता पिण्याच्या पाण्याच्या योजनांना शासनाने आराखड्यानुसार मंजुरी देऊन निधी वितरित करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनांना सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रके तयार करण्यास जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून आणि प्रशासकीय मान्यता देण्यास जिल्हा परिषदेकडून दिरंगाई केली जात असल्याने उक्त योजना सुरु होण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पाटण मतदारसंघातील एकूण २६ मागासवर्गीय वस्तीतील पिण्याच्या पाण्याच्या योजनांचा सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील आराखडयात समावेश असून अद्यापही या कामांची अंदाजपत्रके करून यास प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात सातारा जिल्हा वार्षिक आराखड्यामध्ये विशेष घटक योजनेअंतर्गत मागासवर्गीय वस्त्यांकरिता पिण्याच्या पाण्याच्या योजनांना निधी मंजूर असताना या कामांच्या प्रशासकीय मान्यता देण्यास दिरंगाई होत आहे याची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशी मागणीही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त कामांना प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१५-०३-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता ५५ योजनांचा विशेष घटक योजनाअंतर्गत एकूण रु.४१०.६७ लक्ष किंमतीचा आराखडा कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद,सातारा यांचेमार्फत तयार करुन जिल्हा वार्षिक आराखड्यामध्ये समाविष्ठ करणेत आला होता. त्यासाठी रु.२८३.४३ लक्ष इतका निधी/ अनुदान मंजूर करणेत आले होते.
(२) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या दि.२९.६.२०१५ व दि.२९.७.२०१५ च्या पत्रान्वये नवीन योजना हाती घेण्यात येऊ नयेत अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्यामुळे,राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१५-२०१६ व २०१६-२०१७ च्या आराखड्यातील योजनांना मान्यता देण्यात आलेली नाही.
(३) हे खरे नाही.

सन २०१६-२०१७ च्या आराखड्यात पाटण तालुक्यातील २२ योजनांचा समावेश होता परंतु केंद्र शासनाच्या दि.२९.६.२०१५ व दि.२९.७.२०१५ च्या पत्रान्वये नवीन योजना हाती घेण्यात येऊ नयेत.ज्या योजनांना दि.२९.६.२०१५ पूर्वी कार्यादेश देण्यात आले आहेत अशाच योजनांवर निधी खर्च करण्यात यावा अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्यामुळे,राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१५-१६ व २०१६-१७ च्या आराखड्यातील योजनांना मान्यता देण्यात आलेली नाही.त्यामुळे विशेष घटक योजनेंतर्गत रु.२८३.४३ लक्ष इतका प्राप्त झालेला निधी कोषागारातुन आहरीत करण्यात आला नाही.
(४) हे खरे नाही.
(५) सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत कृती आराखडा SLSSC च्या दि.२ जुन,२०१७रोजी मंजूरी देण्यात आली असून त्यामध्ये पाटण तालुक्यातील ३१ योजनांचा समावेश विशेष घटक योजनेंतर्गत करण्यात आला आहे. शासन पत्र क्रमांक:राग्रापे-२०१७/प्र.क्र.८२ (भाग-१)/पापु-१०, दि.१२.२.२०१८अन्वये विशेष घटक योजना पूर्ण करण्यासाठी रु.३.०० कोटी निधी प्राप्त झाला आहे. विशेष घटक योजनांच्या २० अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता देण्यात आली असून संबंधित ग्रामपंचायतीस प्रशासकिय मान्यता देवून निविदा कार्यवाही सुरु करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्राप्त झालेली रक्कम लवकरात लवकर खर्च करण्याच्या दृष्टीने सर्वोतोपरी प्रदान करण्यात येत आहेत.

---

### संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेसाठी लागणाऱ्या उत्पन्न दाखल्याबाबत

**(२४) ९५६६५ (०९-०१-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गाधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांना लागणारा मा.तहसिलदार यांचा रू.२१ हजार चा उत्पन्न दाखला मिळविण्यासाठी बराच त्रास सहन करावा लागत असून सदरहू सर्व लाभार्थी हे ६५ वर्षापेक्षा जास्त वयाचे असल्याने मा.तहसिलदार यांच्या उत्पन्न दाखल्याऐवजी मा.तलाठी यांचा दाखला ग्राहृय धरण्यात यावा, अशी मागणी माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये वा त्या दरम्यान लोकप्रतिनिधींकडून करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) प्रस्तुत प्रस्तावाबाबत महसूल वन विभागाचे अभिप्राय घेण्यात आले असून महसूल व वन विभागाने उत्पन्नाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्जदाराने तहसिलदार यांच्याकडे अर्ज करणे अपेक्षित असून तलाठयाने दिलेल्या उत्पन्नाच्या अहवालाच्या आधारे लाभार्थ्यास कोणताही लाभ देणे अपेक्षित नाही, असे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार तलाठी यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला ग्राहृय धरता येणार नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईतील फोर्ट येथील सहनिबंधक कार्यालयातील सोयीसुविधांबाबत

**(२५) ९५८३८ (०६-०१-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील फोर्ट, मल्होत्रा हाऊस येथे असणाऱ्या सहनिबंधक कार्यालयात सोयी-सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयातील प्रवेशाच्या ठिकाणी छतातून पाणी गळणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसणे, पुरेशे पंखे नसणे इ. गैरसोयी असून कार्यालयात पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याने तेथील कर्मचाऱ्यांवर अधिक भर पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-०३-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) मल्होत्रा हाऊस येथील जागा मालकाशी असलेला वाद न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार सदर जागेचे भाडे न्यायालयात जमा करण्यात येत आहे. यास्तव जागा मालकाकडून सदर जागेची दुरुस्ती झालेली नाही. अद्यावत सुविधा पुरविण्याकरीता जागेच्या मालकाशी वाटाघाटी करुन कर्मचा-यांना अद्यावत सुविधा पुरविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. वर्ग-३, वर्ग-४ कर्मचारी भरतीचे अधिकार सहनिबंधक कार्यालयास असून सन २०१६-१७ ची सरळसेवा भरतीकरीता आकृतीबंधाला मंजूरीची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. आकृतीबंधाला मंजूरी मिळाल्यानंतर आवश्यकतेनुसार भरती प्रक्रीयेची कार्यवाही करणे शक्य होईल.

---

**राज्यातील महापुरुषांची छायाचित्रे शासकीय मुद्रणालयात मिळत नसल्याबाबत**

**(२६) ९५८८१ (२९-१२-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक सुधारणेचा विचार आणि कार्याद्वारे देशाला विकासाची दिशा देणाऱ्या महात्मा जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज या महापुरुषांची छायाचित्रे शासकीय मुद्रणालयात मिळत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाहू महाराजांचे छायाचित्र छापण्यासाठी मुंबईतील कार्यालयाकडे गेल्या दोन वर्षापासून कोल्हापूरच्या मुद्रणालयात शाहू महाराजांच्या छायाचित्राची वारंवार मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२६-०२-२०१८) :** (१) राज्यात सामाजिक सुधारणेचा विचार आणि कार्याद्वारे देशाला विकासाची दिशा देणाऱ्या सावित्रीबाई फुले व राजर्षी शाहू महाराज या दोन महापुरुषांची छायाचित्रे सर्व शासकीय ग्रंथागारामध्ये विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. महात्मा ज्योतिराव फुले यांचे रंगीत छायाचित्र सामान्य प्रशासन विभाग यांनी अंतिम मान्यता दिल्यानंतर सदर छायाचित्र सर्व शासकीय ग्रंथागारांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) होय.

शाहू महाराजांच्या छायाचित्राची मागणी होत असल्यामुळे सदरील छायाचित्र शासकीय ग्रंथागार, कोल्हापूर येथे विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(३) ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज व इतर १० राष्ट्र महापुरुषांच्या छायाचित्रांच्या पुर्नमुद्रणाचे काम पुर्ण झाले असून सर्व शासकीय ग्रंथागारांना वितरित करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येवला व नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यांमधील विद्युत पुरवठा सुरळीत करण्याबाबत**

**(२७) ९६११३ (२९-१२-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला व नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यांमधील विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी मनमाड अतिउच्च दाब उपकेंद्राची क्षमता वाढ करून हे उपकेंद्र २२० केव्ही क्षमतेचे करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महापारेषण कंपनीच्या १३२ के.व्ही. मनमाड उपकेंद्राची श्रेणीवाढ (Upgradation) करुन सदर ठिकाणी २२० के.व्ही. उपकेंद्र उभारणीसाठीच्या प्रस्तावास महापारेषण कंपनीतर्फे ठराव क्र. १२४/१२, दि. २६.१२.२०१७ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**चंद्रसागर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, औरद (शहा) (ता.निलंगा, जि.लातूर)**
**या संस्थेच्या शाळा हस्तांतरणात झालेल्या अनियमिततेबाबत.**

**(२८) ९६२९७ (०६-०१-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रसागर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, औरद (शहा) (ता.निलंगा,जि.लातूर) या संस्थेस शाळा हस्तांतरणात शासनाने चौकशी केली असून चौकशीत प्रस्तुत प्रकरणी झालेल्या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर व दोषी शाळावर अद्यापपर्यंत कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रस्तुत प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध चौकशी करण्याच्या अनुषंगाने आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचेकडून अहवाल तसेच, दोषारोपपत्र मागविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आदिवासी विकास विभागाच्या येवला (जि.नाशिक) येथे नाशिक प्रकल्पाचे तर नांदगाव (जि.नाशिक) येथे कळवण प्रकल्पाचे उपकार्यालय निर्माण करण्याबाबत**

**(२९) ९६३४० (२९-१२-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागाच्या येवला (जि.नाशिक) येथे नाशिक प्रकल्पाचे तर नांदगाव (जि.नाशिक) येथे कळवण प्रकल्पाचे उपकार्यालय निर्माण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०८-०३-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) येवला व नांदगाव (जि.नाशिक) ही दोन्ही ठिकाणे आदिवासी उपयोजना बाह्यक्षेत्रात येतात. बाह्यक्षेत्रामध्ये फक्त वैयक्तिक लाभाच्या योजना अनुज्ञेय आहेत. त्यामुळे नवीन कार्यालयासाठी पुरेसा कार्यभार (Workload) उपलब्ध होत नाही. सदर ठिकाणी नवीन उपकार्यालय सुरु करण्याविषयी व्यवहार्यता तपासून पाहण्याची बाब प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीने भुखंडाची कमी दराने विक्री केल्याबाबत**

**(३०) ९६६९५ (०२-०१-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीने थकविलेले कर्ज वसुल करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने बाजार समितीचा नाशिक रोड येथील भूखंड नियम डावलून रेडिरेकनर दरापेक्षा कमी दराने भूखंडाची विक्री करुन सुमारे ६३ कोटी ५४ लाख रुपयाचे बाजार समितीचे नुकसान झाल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी बाजार समितीचे आर्थिक नुकसान केल्याप्रकरणी या सर्व निर्णयास व व्यवहारास जबाबदार असलेल्या बँकेच्या कार्यकारी संचालक व संबंधीत अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबीत करुन त्यांचेविरुध्द गुन्हे दाखल करण्याबाबत लेखी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने याप्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२१-०३-२०१८) :** (१) नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीने राज्य सहकारी बँकेकडून घेतलेले कर्ज परतफेड करण्यासाठी राज्य बँकेने व नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीने, समितीची नाशिकरोड व इतर भूखंडाची नियमबाह्यरित्या विक्री केल्याबाबत तसेच रेडिरेकनरच्या दरापेक्षा अत्यल्प दराने भूखंडाची विक्री केल्याने सुमारे रू.६३,५४,४७,८०१/ इतक्या रकमेचे बँकेचे व बाजार समितीचे नुकसान झाले असल्याची बाब, बाजार समितीच्या सन २०१३-१४ या कालावधीच्या लेखापरीक्षण अहवालावरून जून २०१५ मध्ये जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांच्या निदर्शनास आली आहे.
(२) होय.
नाशिक बाजार समितीच्या सन २०१३-१४ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये आर्थिक नुकसानीस जबाबदार असलेल्यांच्या विरुद्ध कारवाई करणे संदर्भात जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांच्याकडे निवेदने प्राप्त झाली आहेत.
(३) व (४) नाशिक बाजार समितीच्या सन २०१३-१४ च्या लेखापरीक्षण अहवालातील आर्थिक नुकसानीच्या अनुषंगाने व इतर गंभीर मुद्यांची जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी दि.३.८.२०१५ व दि.२६.८.२०१५ रोजीच्या दुरुस्ती आदेशान्वये महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन(विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४० अन्वये चौकशी करण्याचे आदेश दिले असून विशेष लेखापरीक्षक वर्ग-२ सहकारी संस्था फिरते पथक यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. सदर चौकशी आदेशाविरूद्ध नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ येथे रिट याचिका क्र. १९६५/२०१६ दाखल केली आहे. सदर याचिकेत मा.उच्च न्यायालयाने दि.२२ मार्च २०१६ रोजी सदर चौकशीच्या अनुषंगाने precipitative steps घेऊ नयेत असे आदेशित केले आहे. त्यामुळे सदरची चौकशी पूर्ण करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

___________

**चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील सात गावांची नळ पाणीपुरवठा योजना प्रलंबित असल्याबाबत**

**(३१) ९७१५४ (२९-१२-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील सात गावांची नळपाणीपुरवठा योजना निधी अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर गावाच्या पेयजल योजनेस निधी पुरवून योजनेचे काम लवकरात लवकर होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१६-०३-२०१८) :** (१) होय अंशत: खरे आहे.

सन २०१७-१८ मधील आर्थिक वर्षामध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत चंदनगड तालुक्यामधील हलकर्णी पैकी हलकर्णी फाटा, महिपाळगड, पाटणे, दिंडलकोप, नांदवडे, करेकुंडी व कोनेवाडी या सात नळ पाणी पुरवठा योजनांपैकी दिंडलकोप, नांदवडे, करेकुंडी व कोनेवाडी या चार योजनाची कामे निधी कमी प्राप्त झाल्यामुळे अपूर्ण आहेत.

(२) सन २०१७-१८ मध्ये प्राप्त होणाऱ्या निधीमधून संबंधित योजनांच्या ग्रामीण पाणी पुरवठा समिती कडून मागणी केलेल्या हप्त्यानुसार निधी उपलब्ध करुन देणेची कार्यवाही करण्यात आली आहे व योजना तातडीने कार्यान्वीत करुन घेणेसाठी नियोजन केले असून निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणे कामांची देयके अदा करणेची दक्षता घेणेत येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीने विकासकामे करण्यासाठी तयार केलेल्या आराखड्याबाबत**

**(३२) ९७८३८ (०३-०१-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीने (जि.पुणे) येथील स्वच्छता गृहे, रस्ते, गटार दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे बांधकाम यासाठी आराखडे तयार केले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामांसाठी निधी खर्च करण्यासाठी शासनाची परवानगी घ्यावी लागत असल्यामुळे ही कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विकासकामे करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२१-०३-२०१८) :** (१) होय.

(२) नाही.

(३) कृषी उत्पन्न बाजार समिती,पुणे यांनी करावयाच्या प्रस्तावित विकास कामांचे प्रस्तावाच्या अनुषंगाने पणन संचालक,पुणे यांनी समितीच्या मुख्य बाजार आवारातील गुळ-भुसार विभागातील सर्व्हिसलेन काँक्रीटीकरण, रस्ते डांबरीकरण या कामासाठी रू.१७,४५,६२,९७८/- इतक्या खर्चास दि.९.९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी दिली आहे. त्याचप्रमाणे मुख्य बाजार आवारातील स्वच्छतागृहे दुरूस्तीच्या कामासाठी पणन संचालक, पुणे यांनी दि.२६.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये रू.११,७७,२३८/- व दि.१५.२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये रु.२,०६,४२०/- इतक्या रकमेच्या खर्चास मंजूरी दिली आहे. तसेच बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारातील जूनी पाण्याची टाकी पाडून नवीन बांधकाम करण्याच्या प्रस्तावामध्ये काही कागदपत्रांची उणिव असल्याने सदर कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी बाजार समितीस पणन संचालक, पुणे यांनी दि.२४.१.२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## माण-हिंजवडी (ता.मुळशी, जि.पुणे) येथील एमआयडीसीच्या चांदे ते माण रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(३३) ९७८६४ (२९-१२-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माण-हिंजवडी (ता.मुळशी, जि.पुणे) येथील एमआयडीसीच्या चांदे ते माण रस्त्याची दुरावस्था झाली असून येथील रस्त्यावर मोठया प्रमाणात पडलेल्या खड्डयांमुळे वाहनचालक व नागरिक यांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावरुन प्रवास करणाऱ्या नागरीकांना होणारी गैरसोय तसेच सदर रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-०२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

स्थानिकांनी गटारी खोदण्याच्या कामास विरोध केल्यामुळे पावसाच्या पाण्याचा निचरा व्यवस्थित न झाल्याने काही प्रमाणात रस्त्यास खड्डे पडले होते.

महामंडळाने सदर रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम माहे ऑक्टोबर, २०१७ ते डिसेंबर, २०१७ मध्ये पूर्ण केले आहे.

(२) सदर रस्त्याच्या रुंदीकरण मजबुतीकरण व डांबरीकरणासाठीच्या रू. ५८१ १४ लक्ष (नक्त) व रू. ६६८.१०० लक्ष (ठोक) रकमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झालेली आहे.तथापी जागेअभावी रस्त्याचे रूदीकरण शक्य नसल्याने उपलब्ध असलेल्या रुंदीमध्येच रस्त्याचे मजबुतीकरण, डांबरीकरणाचे कामासाठीनिवीदा प्रसिध्द करण्याची प्रक्रिया सूरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील वीज निर्मिती प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विलंब झाल्याने जादा निधीची तरतूद करण्याबाबत**

**(३४) ९९१९३ (०१-०१-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीज निर्मिती प्रकल्प पूर्ण करण्यासाठी झालेल्या विलंबामुळे शासनाला जादा निधीची तरतूद करावी लागणार असून महानिर्मितीच्या कोराडी, परळी आणि चंद्रपूर येथील जुन्या संचाची भांडवली किंमत आणि वीजदर निश्चितीसाठी महानिर्मितीने राज्य वीज नियामक आयोगाकडे याचिका दाखल करुन परवानगी मागितली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानिर्मिती कंपनीकडून रु.६५०० कोटीहून अधिक रक्कम व्याजासाठी खर्च करण्यात आली असून कोराडी संच क्र.८,९,१० तसेच चंद्रपूर संच क्र.८,९ आणि परळी संच क्र.८ यांचा पूर्ण होण्याचा कालावधी ३ ते ४ वर्षांनी वाढल्यामुळे परताव्याच्या रकमेत वाढ झाल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्प दिरंगाईची ३३ टक्के जादा रक्कम वीजग्राहकाकडून वसूल करण्याचा महानिर्मिती कंपनीने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अडीच ते तीन वर्षात पूर्ण होणारे वीज निर्मिती प्रकल्प पूर्ण होण्यास सहा ते सात वर्षे लागण्याची कारणे काय आहेत तसेच वीज ग्राहकांवर वीज दरवाढीचा भार पडू नये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-०२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) अ.महानिर्मिती कंपनीकडून रू.६५०० कोटीहून अधिक रक्कम व्याजासाठी खर्च करण्यात आली हे खरे आहे.

अ) चंद्रपूर संच क्र. ८,९ आणि परळी संच क्र.८ यांचा पूर्ण होण्याचा कालावधी ३ ते ४ वर्षांनी वाढला आहे तथापि कोराडी संच क्र. ८,९,१० यांचा पूर्ण होण्याचा कालावधी ३ पेक्षा कमी वर्षाने वाढला आहे.

आ) परताव्याच्या रकमेत वाढ झाली हे खरे आहे तथापि प्रकल्प विलंबामुळे झालेली व वीज नियामक आयोगाने मंजूर केलेली प्रकल्प निहाय वाढ खालील प्रमाणे आहे.

कोराडी प्रकल्प: रू. ६७२.७५ कोटी

चंद्रपूर प्रकल्प: रू. ६५२.९२ कोटी

परळी प्रकल्प: रू. २३८.८८ कोटी

एकूण वाढ: रू. १५६४.५५ कोटी

ही वाढ एकूण प्रकल्प किमतीच्या ६.२७ % इतकी आहे.

(३) वरील प्रमाणे प्रकल्प विलंबामुळे झालेली ६.२७ % वाढीला वीज नियामक आयोगाने मंजुरी दिली आहे.

(४) प्रकल्पांच्या विलंबाची सर्वसाधारण कारणे खालील प्रमाणे आहे :

१. प्रकल्प सुरु करण्यासाठी आवश्यक प्राथमिक साधनांची जुळवाजुळव करण्यास मुख्य संयंत्र (BTG) व उर्वरित संयंत्र (BOP) कंत्राटदाराकडून झालेला विलंब.

२. कंत्राटदारांकडील अपुरे मनुष्यबळ तसेच कंत्राटदारांकडून संसाधन व्यवस्थापनाचा अभाव.

प्रकल्पनिहाय इतर कारणे पुढील प्रमाणे आहेत :-

अ. कोराडी प्रकल्प विलंबाची कारणे :

१. कंत्राटदारांकडून साधनसामुग्री पुरवठयासंदर्भात विलंब व सुसूत्रतेचा अभाव.

२. उर्वरित संयंत्र (BOP) कंत्राटदाराची खालावलेली आर्थिक स्थिती व त्यानुषंगाने कंत्राटदारावर आलेले आर्थिक निर्बंध.

ब. चंद्रपूर प्रकल्प विलंबाची कारणे :

१. सन २०१० मध्ये पाण्याच्या कमतरतेमुळे स्थापत्य बांधकामास झालेला विलंब.

२. सन २०१३ मध्ये अतिवृष्टीमुळे उर्वरित संयंत्र (BOP) व स्थापत्य कामात झालेला विलंब.

३. माहे ऑक्टोबर, २०१३ ते माहे जानेवरी, २०१४ पर्यंत वाळूच्या तुटवडयामुळे स्थापत्य कामास झालेला विलंब.

क. परळी प्रकल्प विलंबाची कारणे :

१. उर्वरित संयंत्र (BOP) कंत्राटदाराची खालावलेली आर्थिक स्थिती आणि त्यानुषंगाने कंत्राटदाराच्या उप कंत्राटदारांनी आर्थिक कारणांमुळे थांबवलेले काम.

२. सन २०१२ ते २०१५ च्या दुष्काळी परिस्थितीमुळे पाणी पुरवठयात झालेली कमतरता.

प्रकल्प दिरंगाई संदर्भात महानिर्मितीकडून करण्यात आलेली कार्यवाही :

महानिर्मितीकडून प्रकल्प दिरंगाई संदर्भात विश्लेषणासाठी त्रयस्थ संस्थांची नेमणूक करण्यात आली आहे. सदर संस्थांकडून विलंब विश्लेषणाचे काम प्रगतीपथावर आहे. विलंब विश्लेषणानंतर (Delay Analysis) निर्धारित नुकसान भरपाईची (Levy of LD) रक्कम सदर कंत्राटदारांकडून कराराच्या अटी व शर्तीनुसार वसूल करण्यात येईल.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**औरंगाबाद नगर रस्त्यावर गोलवाडी फाट्याजवळ प्रवेश कराच्या वसुलीसाठी तिप्पट वसुली होत असल्याबाबत**

**(३५) ९९२४४ (०३-०१-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद-नगर रस्त्यावरील गोलवाडी फाट्याजवळ छावणी परिषदेच्या वतीने प्रवेश कराची अधिकृत फी रुपये ६० असताना नाक्यावर या रकमेच्या तिप्पट म्हणजे रुपये १८० बळजबरीने वसुल केले जात असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसुलीसाठी दमदाटी व वेळप्रसंगी मारामारी देखील केली जात असून ही वसुली स्थानिक पोलिसांच्या समोर केली जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदर अवैध वसुली बंद करण्याबाबत व अवैध वसुली करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१८) :** (१) व (२) होय. अशा आशयाची तक्रार औरंगाबाद कटक मंडळाकडे दिनांक ६ एप्रिल, २०१७ अन्वये प्राप्त झाली आहे. त्याचप्रमाणे अशा आशयाच्या प्राप्त तक्रारीवरुन छावणी पोलीस स्टेशन जिल्हा औरंगाबाद येथे गु.र.नं.२७७/२०१७ अन्वये दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) औरंगाबाद कटक मंडळामार्फत करण्यात आलेल्या चौकशीअंती प्रवेश कर रुपये ६०/- ऐवजी रु.१८०/- वसूल करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले असून संबंधित ठेकेदारास रुपये १०३,५००/- इतका दंड ठोठावण्यात आला असून ताकीद देण्यात आली आहे.

छावणी पोलीस स्टेशन जिल्हा औरंगाबाद येथे दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने आरोपीस अटक करण्यात आली असून पोलीस तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील निराधारांना मानधनापासून वंचित रहावे लागत असल्याबाबत**

**(३६) ९९३८० (०६-०१-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध योजनांसाठी आधारकार्ड आवश्यक केले असुन निराधारांना मानधन देण्यासाठी शासनाने बायोमेट्रीक मशिनचा आधार घेतला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कष्ट करणाऱ्या अनेक गरिबांच्या बोटांच्या रेषाच मिटल्या असल्याने, सदर कष्ट करणाऱ्या गरिबांचे बायोमेट्रीक मशिनमध्ये अंगठयाचे ठसे उमटत नसल्याने निराधारांना मानधनापासून वंचित रहावे लागत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने योग्य ती उपाययोजना करुन या वंचित निराधारांना मानधन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०२-२०१८) :** (१) राज्यात फक्त ठाणे, कोल्हापूर, बीड व नांदेड या जिल्ह्यासाठी विशेष सहाय्य कार्यक्रमातंर्गत योजनातील लाभार्थ्यांचे अनुदानाचे वाटप बायोमॅट्रीक पध्दतीने आय.सी.आय.सी.आय. बँकेच्या सहयोगाने प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आले.
(२) व (३) विशेष सहाय्य कार्यक्रमातंर्गत योजनांतील लाभार्थ्यांना आयसीआयसीआय बँकेमार्फत बायोमॅट्रीक पध्दतीने अनुदानाचे वाटप करतांना हाताचे ठसे उमटत नसलेल्या लाभार्थ्यांच्या अनुदानाचे वाटप बँकेमार्फत आधार संलग्न बँक खात्यात करण्यास जिल्हाधिकारी, ठाणे, बीड, नांदेड व कोल्हापूर कार्यालयास दिनांक ११.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सूचना दिल्या आहेत. त्याअनुषंगाने लाभार्थ्यांना अनुदानाचे वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रात वाढणारे अतिक्रमण हटविण्यासाठी पोलीस व महसूल अधिकाऱ्यांचे स्वतंत्र पथक गठीत करण्याबाबत**

**(३७) ९९४५७ (०३-०१-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रात वाढणारे अतिक्रमण हटविण्यासाठी पोलीस व महसूल अधिकाऱ्यांचे स्वंतत्र पथक करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने परिपत्रक काढून सदर पथक गरजेनुसार गठीत करण्याचे निर्देश एमआयडीसीच्या विभागीय कार्यालयांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, शासनाने वाशिमसह विदर्भातील एमआयडीसी मध्ये पोलीस व महसूल अधिकाऱ्यांचे स्वंतत्र पथक स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-०२-२०१८) :** (१) होय.
या संदर्भातील शासन निर्णय दिनांक ०७/१०/२०१७ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे.

(२) शासन निर्णय दिनांक ०७/१०/२०१७ अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत मरोळ, डोंबिवली, ठाणे, टी.टी.सी., बदलापूर, तळोजा, व आवश्यकतेनुसार इतर औद्योगिक क्षेत्राकरिता महामंडळाचे स्वतंत्र अतिक्रमण निष्कासन दल निर्माण करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

(३) व (४) शासन निर्णय दिनांक ०७/१०/२०१७ नुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत मरोळ, डोंबिवली, ठाणे, टी.टी.सी., बदलापूर, तळोजा, व आवश्यकतेनुसार इतर औद्योगिक क्षेत्राकरिता महामंडळाचे स्वतंत्र अतिक्रमण निष्कासन दल निर्माण करण्यास शासनाने मान्यता दिलेली असल्यामुळे वाशिमसह विदर्भातील एमआयडीसीमध्ये पोलीस व महसूल अधिकाऱ्याचे स्वतंत्र पथक स्थापन करणेबाबत कोणतीही स्वतंत्र कार्यवाही नाही. परंतु महामंडळाचे सदरचे अतिक्रमण निष्कासन दल आवश्यकतेनुसार महामंडळातील इतर औद्योगिक क्षेत्रातील अतिक्रमण हटविण्याकरिता स्थापन केलेले आहे.

---

**राज्यातील अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी बंद केलेल्या योजना पुन्हा सुरु करण्याबाबत**

**(३८) ९९४९० (०६-०१-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जातीच्या बांधवावर मोठया प्रमाणात अन्याय सुरु असून त्यांच्या कल्याणासाठी तत्कालीन शासनाने सुरु केलेल्या तब्बल ३५१ योजना बंद केल्या असल्याचे माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना साडेनऊ कोटी रुपयांचे अनुदान दिले जात असून मात्र त्यात ५० टक्के कपात केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अनुसूचीत जातीत तीव्र असंतोष असल्यामुळे त्यांच्या कल्याणासाठी शासनाने बंद केलेल्या योजना पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२७-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

राज्यातील अनुसूचित जातींच्या सन २०१५-१६, २०१६-१७ मध्ये राबविण्यात येणा-या सर्व योजना सन २०१७-१८ मध्येही राबविण्यात येत आहे.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील सहकारी संस्थांनी लेखा परिक्षण न केल्याबाबत**

**(३९) ९९७०४ (०६-०१-२०१८). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सहकारी संस्थांच्या कारभाराची लेखापरिक्षण आर्थिक वर्ष संपल्यानंतर संबंधित संस्थांनी त्याबाबतचा अहवाल दिनांक ३० ऑगस्ट पूर्वी सहकार विभागाला पाठविणे बंधनकारक आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील तब्बल २१,००४ सहकारी संस्थांनी लेखापरिक्षण अद्यापही केलेले नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१६-१७ मध्ये सहकार विभागाने नियुक्त केलेल्या १४०० लेखापरिक्षकांनी संबंधित सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण न करण्याची कारणे काय आहेत तसेच लेखा परिक्षण न करणाऱ्या १४०० लेखापरिक्षकांनी पाठविलेल्या नोटीसांना संबंधितांकडून खुलासा प्राप्त झाला आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१२-०३-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

लेखापरिक्षकांनी लेखापरिक्षण पुर्ण केल्यानंतर लेखापरिक्षण अहवाल एक महिन्याच्या आत व कोणत्याही परिस्थितीत अधिमंडळाची वार्षिक बैठकीची नोटीस देण्यापूर्वी किंवा ३० सप्टेंबर अखेर सादर करण्याची तरतूद आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

मुंबईमध्ये सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षणास पात्र असलेल्या एकूण २९०६३ संस्थांपैकी एकूण २०२१६ संस्थांचे लेखापरिक्षण पुर्ण झालेले असून, उर्वरित ८८४७ संस्थांचे लेखापरीक्षण अद्याप पुर्ण झालेले नाही.

(३) व (४) मुंबईत लेखापरीक्षणाकरीता लेखापरीक्षक नामतालीकेवर १६५२ इतके लेखापरीक्षक असून, सहकारी संस्थांनी त्यातूनच लेखापरीक्षकांच्या नियुक्त्या केल्या होत्या. लेखापरीक्षण पूर्ण न केलेल्या ८८४७ संस्थांना व संबंधित लेखापरीक्षकांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७५ व कलम ८१ तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नियम ६९ अन्वये नोटीस बजावण्यात आल्या होत्या. त्यावर प्राप्त झालेल्या खुलाशानुसार त्यांनी संस्थांचे दप्तर अपूर्ण असणे, लेखापरीक्षणास दप्तर उपलब्ध करुन न देणे, लेखापरिक्षकास सहकार्य न करणे, संस्थेचा पत्ता न सापडणे, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची वारंवार चकरा मारुन भेट न होणे,

संस्थेकडे रेकॉर्ड लिखाण कामासाठी कायम सेवकवर्ग नसणे, संस्थेस लेखापरिक्षण शुल्क अदा करण्यास पुरेसा निधी उपलब्ध नसणे, गृहनिर्माण संस्थांमध्ये लेखापरिक्षणाबाबतची जागरुकता नसणे, संस्था बंद व कार्यस्थगित असणे इत्यादी कारणे नमूद केलेली आहेत.

सदरच्या कारणांची सत्यता पडताळून दोषी लेखापरीक्षाकांवर नामतालीकेवरुन बडतर्फीची कारवाई केलेली आहे. तसेच ज्या संस्था लेखापरीक्षण करुन घेत नाहीत त्यांच्या संचालकांना संचालक मंडळावरुन कमी करण्याबाबत तसेच फौजदारी कारवाईबाबत नोटीस देण्यात आलेल्या आहेत तर काही संस्था अवसायानात काढण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तथापि, काही सहकारी गृहनिर्माण सहकारी संस्थेमध्ये सभासद निवास करीत असल्याने अशा संस्थांनी लेखापरिक्षण करुन घेतले नाही म्हणून या संस्था अवसायनात काढणेवर मर्यादा येत असल्याने अशा गृहनिर्माण संस्थांवर अवसायनात घेण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(५) लागू नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील औद्योगिक विभागातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(४०) १०००२५ (०३-०१-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील विशेषत: औद्योगिक विभागातील रस्ते अतिशय खराब झाल्यामुळे पावसाळ्यामध्ये तेथील अनेक रस्त्यांवर वाहतूक बंद करण्यात आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक विभागातील बंद करण्यात आलेले रस्ते कोणते आहेत,

(३) असल्यास, उक्त मार्गांवरील वाहतूक बंद पडल्यामुळे तेथील शेतकरी, कामगार व स्थानिक नागरिकांची गैरसोय झाल्याने तसेच संबंधित रस्ते दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-०२-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही

(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या तारापूर औद्योगिक क्षेत्रातील अंतर्गत रस्त्यावर पावसाळयात खड्डे पडल्यामुळे वाहतूक बंद करण्यात आली नव्हती. परंतु महामंडळातर्फे सदर रस्त्यावर पावसाळयात पडलेले खड्डे व मुरुम व खडीने दुरुस्त करण्याचे काम वेळावेळी करण्यात आले असून पावसाळयानंतर सदर खड्डयाचे डांबरीकरण व मजबुतीकरण करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर रस्त्यावरील वाहतूक ही निरंतर व विना अडथळा सुरळीत चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयात दारुबंदी करुनही अवैध दारुचा व्यवसाय सुरु असल्याबाबत

**(४१) १००१८३ (२९-१२-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात दिनांक १ एप्रिल, २०१५ पासून दारुबंदी करुनही अवैध दारुचा व्यवसाय सुरु असल्याबाबत वारंवार तक्रारी करुनही कोणतीच कारवाई होत नसल्याने दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास चिमूर तालुक्यातील वहाणगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयात आंदोलन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने अवैध दारुचा व्यवसाय बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२६-०२-२०१८) :** (१) व (२) अंशतः खरे आहे. चंद्रपूर जिल्हयातील अवैध दारू विक्रीबाबत शासनाने कठोर उपाययोजना करण्यासाठी मौजे वहाणगाव ग्रामपंचायतीमधील स्थानिक लोकप्रतिनिधींनी गावकऱ्यांसोबत दि.२३.१०.२०१७ रोजी दारु विक्रीचे फलक झळकावून बेकायदेशीर आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. तथापि, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी, वरोरा व तहसिलदार, चिमूर यांनी शासनाचे धोरण व कायदेशीर बाबी आंदोलनकर्त्यांना समजावून सांगितल्यानंतर सदर आंदोलन मागे घेण्यात आले. दि.२६.१०.२०१७ रोजी वहाणगाव येथे निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारीपथक चंद्रपूर / गडचिरोली यांनी ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन सरपंच, उपसरपंच तसेच पोलीस पाटील व तंटामुक्ती अध्यक्ष यांची भेट घेवून त्यांचे जबाब नोंदविले असता त्यांनी वहाणगावात संपूर्ण दारुविक्री धंदे बंद असून सध्या गावात कोणीही दारुविक्री करत नसल्याचे सांगितले. तसेच भविष्यात गावात दारुविक्री होणार नाही व झाल्यास सूचना देण्यात येईल, असे सांगितले.

(३) चंद्रपूर जिल्हयात दारुबंदी करूनही अवैध दारूचा व्यवसाय सुरु असलेबाबत मौजे वहाणगाव, ता.चिमूर येथील व्हॉटस अप तक्रार दि.२३.९.२०१६ रोजी राज्य उत्पादन शुल्क विभागास प्राप्त झाली होती. सदर तक्रारीनुसार दि.१८.१०.२०१७ रोजी एका घरावर छापा टाकून रु.१.३८ लक्ष किंमतीचा मुद्देमाल जप्त करून एका व्यक्तीस अटक करून गुन्हा नोंदविण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्हा दारुबंदीनंतर राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत वहाणगाव येथे एकूण ३ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

तसेच, सन २०१७ मध्ये पोलीस विभागाकडून मौजे वहाणगाव येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाखाली ११ गुन्हयांची नोंद केली आहे. अवैध दारू बाळगणे, वाहतूक व विक्रीच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क व पोलीस विभागामार्फत वेळोवेळी विशेष छापे मोहिम राबवून कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाघळूज (ता.आष्टी, जि.बीड) येथे वीज उपकेंद्र तातडीने कार्यान्वित करण्याबाबत**

**(४२) १००३७१ (२९-१२-२०१७). अ‍ॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघळूज (ता.आष्टी, जि.बीड) येथे २३२ के.व्ही.च्या वीज उपकेंद्राच्या बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले मात्र आजतागायत सदर वीज उपकेंद्राचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, या बाबतीत शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर पहाणीत काय आढळून आले आहे आणि सदर वीज उपकेंद्राच्या बांधकामास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत;

(४) तसेच, सदरहु उपकेंद्राचे बांधकाम किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-०२-२०१८) :** (१) धानोरा (वाघळूज), ता.आष्टी, जि.बीड येथे महावितरण कंपनीच्या मागणीनुसार प्रस्तावित पवन व सौर ऊर्जा प्रकल्पांच्या अनुषंगाने १३२ के.व्ही. उपकेंद्र प्रस्तावित होते. तथापि, सदर ठिकाणी प्रस्तावित पवन व सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम सुरु झाले नसल्याने प्रस्तावित १३२ के.व्ही. धानोरा वाघळुज उपकेंद्राचे काम स्थगित ठेवण्यात आले आहे.

(२) व (३) धानोरा व नजिकच्या परिसरात महापारेषण कंपनीच्या १३२ के.व्ही. आष्टी उपकेंद्रातून वीजपुरवठा होतो. सदर उपकेंद्रात पुरेशी क्षमता शिल्लक असल्याने व वीजदाबात सुधारणा करण्यासाठी त्या ठिकाणी कॅपॅसिटर बँक उभारण्यात आले असल्याने धानोरा (वाघळूज) येथे सद्यस्थितीत वेगळया अति उच्चदाब उपकेंद्राची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्हयातील उद्योग भवन परिसरातील सहकारी संस्था स्वत:च्या नावाने केल्याबाबत

**(४३) १०१०३७ (०३-०१-२०१८). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील उद्योग संचालनालयाने लातूर इंडस्ट्रीज इस्टेट को.ऑफ सोसायटीस ९० वर्षाच्या करारानुसार उद्योगाकरीता सन १९८२ मध्ये जागा वापरण्यास दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागा लातूर इंडस्ट्रीज इस्टेट को.ऑफ सोसायटीच्या सदस्यांनी स्वतःच्या नावे करुन घेतल्याने जिल्हाधिकारी, लातूर यांनी संबंधितांच्या नोंदी कमी करुन जागा उद्योग संचालनालयाच्या नावे नोंद करण्याबाबत निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लातूरमध्ये सन १९८२ उद्योग भवन परिसरात सहकारी संस्था स्थापन करण्यामध्ये व ९० वर्षाच्या करारानुसार दिलेली जागा स्वतःच्या नावे हडप करण्यामध्ये उपरोक्त सोसायटीमधील सदस्यांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२६-०२-२०१८) :** (१) खरे आहे.
(२) खरे आहे.
(३), (४) व (५) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेमार्फत चौकशी चालू आहे.

---

**परराज्यातील साखर कारखान्यांना गाळपासाठी ऊस देण्यास बंदी करण्याबाबत**

**(४४) १०१३८८ (०६-०१-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१७-१८ या ऊस गाळप हंगाम दिनांक १ नोव्हेंबर पासून सुरु करण्यास मान्यता देण्यात आली असून परराज्यातील साखर कारखान्यांना गाळपासाठी ऊस देण्यास बंदी करण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मंत्री समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०७-०२-२०१८) :** (१) होय.
(२) परराज्यात ऊस निर्यात करण्यास प्रतिबंध करण्यासाठी दिनांक १० ऑक्टोंबर, २०१७ अन्वये शासन अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे. या संदर्भात परवानगी देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्याच्या परवानगी शिवाय दिनांक ३० एप्रिल २०१८ पर्यत राज्याबाहेर ऊस निर्यात करता येणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आयकर विभागाने सन २०१०-११ पासून कोट्यवधी रुपयांच्या**
**नोटीसा कारखान्यांना दिल्याबाबत**

**(४५) १०१३९१ (०६-०१-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आयकर विभागाने सन २०१०-११ पासून एफआरपीपेक्षा जादा दिलेला दर हा कारखान्याचा नफा समजून कोट्यवधी रुपयांच्या नोटीसा कारखान्यांना पाठविल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नोटीसीसंदर्भात साखर कारखान्यांनी काय भूमिका घेतली आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाची कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०९-०३-२०१८) :** (१) होय.
(२) राज्यातील साखर कारखान्यांनी आयकर विभागाकडून आलेल्या नोटीस संदर्भात वेळोवेळी चिफ कमिशनर ऑफ इन्कम टॅक्स, पुणे व नाशिक, विभागीय कार्यालयाकडे कारखान्यांची

सद्यस्थिती मांडून साखर उद्योग अडचणीत आहे याची माहिती दिली. ३५ साखर कारखान्यांनी थोडया फार प्रमाणात हप्ते भरुन तात्पुरती स्थगिती घेतली आहे.

मा.मंत्री समितीच्या धोरणानुसार तरतुदींची पुर्तता केलेनंतर कारखान्यांकडे राहणारा शिल्लक वाढावा अधिक एफआरपी असा निघणारा दर हा एफआरपी पेक्षा जादा असतो. सदरची अदा केलेली ऊस किंमत कारखान्याच्या ताळेबंदात व नफा-तोटा पत्रकात ऊसाची किंमत दाखविली जाते. परंतु सदर जादा झालेली रक्कम ही सहकारी साखर कारखान्याचा नफा नसून ती कारखान्यांनी दिलेली ऊसाची किंमत आयकर खात्याने धंद्याचा खर्च म्हणुन मान्य केला पाहिजे यात नफयाची वाटणी नाही. अशी सहकारी साखर कारखान्यांची भूमिका आहे.

(३) व (४) आयकर कायद्यामध्ये केंद्र शासनाने दिनांक ०१/०४/२०१६ पासून section ३६(i)(xvii) हे सहकारी साखर कारखान्यांसाठी नवीन कलम टाकण्यात आलेले आहे. सदर कलम ३६(i)(xvii) मध्ये "the amount of expenditure incurred by a co-operative society engaged in the business of manufacture of sugar for purchase of sugarcane at a price which is equal to or less than the price fixed or approved by the Government." असे नमूद आहे. मा.मंत्री समितीच्या दि.२०/०९/२०१७ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य साखर संघाने सादर केलेल्या प्रस्तावाचे अनुषंगाने तपासून केंद्र शासनाकडे आयकर कायद्यातील दुरुस्तीबाबतचा प्रस्ताव पाठविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अकोला यांनी बेकायदा मार्गाचा अवलंब केल्याबाबत**

**(४६) १०१९३४ (०६-०१-२०१८). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अकोला यांनी सावकारी प्रकरणे निकाली काढतांना बेकायदा मार्गाचा अवलंब करुन पिडीत शेतकऱ्यांवर अन्याय केल्याची बाब दिनांक २६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिडीत शेतकऱ्यांना न्याय न देता उच्च न्यायालय नागपूर यांच्या रिट याचिका क्र-५९९/२००६ चा आधार घेवून पिडीत शेतकऱ्यांची सुमारे २५ प्रकरणे बेकादेशीररित्या खारिज केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-०३-२०१८) :** (१) नाही.

(२) नाही.

चार प्रकरणांमध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी पिटीशनर श्री.रमेश दौलतराव गव्हाळे यांच्या बाजूने निर्णय दिलेला असून सदर प्रकरणामध्ये न्यायिक प्रक्रियेनुसार व आदेशानुसार निर्णय घेण्यात आला आहे.

इतर प्रकरणे महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील कलम १८ (१) अन्वये १५ वर्षाचे कालमर्यादेबाहेरील असल्याने सदर प्रकरणे खारीज करण्यात आलेली आहेत.
(३) महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यामध्ये ऊस कारखादारांकडून शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाबाबत**

**(४७) १०१९६० (०६-०१-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये ऊस कारखानदारांकडून ऊस घेताना शेतकऱ्यांना साखर कारखानदाराच्या वजन काटयावर वजन करणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे ऊस शेतकऱ्यावर वजन काटयामध्ये कमी वजन भरून त्यांच्यावर अन्याय होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१२-०३-२०१८) :** (१) होय.
(२) नाही.
(३) साखर कारखान्याकडील ऊसाचे वजनकाटे तपासणी करिता राज्यातील जिल्हाधिकारी (सर्व) यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हानिहाय भरारी पथकाची स्थापना केलेली आहे. सदर भरारी पथकांमध्ये महसूल, वैद्यमापन शास्त्र, पोलीस विभाग, प्रादेशिक सहसंचालक (साखर) व शेतकरी यांचे प्रतिनिधींचा समावेश आहे. सदर भरारी पथकांमार्फत १६९ साखर कारखान्यांच्या वजन काटयांची तपासणी करण्यात आली असून त्यामध्ये वजनकाटे योग्य असल्याचे दिसून आलेले आहे व उर्वरित १४ साखर कारखान्यांच्या वजनकाटयांची तपासणी करण्याची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हयातील एम.आय डी.सी क्षेत्रातील प्लॉट ताब्यात घेऊन**
**नवीन उद्योग सुरु करण्याबाबत**

**(४८) १०१९९९ (०३-०१-२०१८). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयातील एम.आय डी.सी क्षेत्रातील एकूण १३७ प्लॉट वितरित केले असून त्यांनी दिलेल्या माहितीनुसार आता त्यांचेकडे केवळ ५ प्लॉट रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वितरित केलेल्या १३७ प्लॉट मधील केवळ ७१ प्लॉट हे गडचिरोली जिल्ह्याच्या नावाने असून, अन्य प्लॉटधारक हे दिल्ली, नागपूर, चंद्रपुर या शहरातील आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास गडचिरोली जिल्हयातील एम.आय डी.सी क्षेत्रातील प्लॉट वितरीत करुन झाले असूनही अद्यापपर्यंत कोणतेही उद्योगधंदे सुरु केलेले नाहीत, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे जिल्हयाचे फार मोठे नुकसान झालेले असून आजतागायत कोणताही उद्योग निर्माण होवू शकला नाही, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने प्लॉटधारकांचे प्लॉट ताब्यात घेऊन त्या प्लॉटवर जिल्हयातील नवीन उद्योग सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०७-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

गडचिरोली जिल्हयातील एम.आय.डी.सी क्षेत्रातील एकूण आरेखित भूखंड २३१ असून त्यापैकी वितरित भूखंड १७० आहेत. ६१ भूखंड रिक्त आहेत.
(२) हे खरे आहे. महामंडळाच्या धोरणाप्रमाणे उद्योजकांना भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) गडचिरोली जिल्हयातील एकूण औद्योगिक क्षेत्रात २३१ आरेखित भूखंडाची सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे.

१) वाटप केलेले भूखंड १७०
२) उत्पादन सुरु असलेले भूखंड ३८
३) उत्पादन बंद असलेले भूखंड १७
४) बांधकाम सुरु असलेले भूखंड १९
५) वाटप केलेल परंतु मोकळे असलेले ९६
६) वाटपास उपलब्ध असलेले भूखंड ६१

गडचिरोली जिल्हयातील एम.आय.डी.सी. क्षेत्रातील मुदत संपलेले ४७ भूखंड परत घेण्यात आलेले असून त्यापैकी ३६ भूखंड पुर्नवाटप करण्यात आलेले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना यासाठी उत्पन्नाची वार्षिक मर्यादा वाढविण्याबाबत**

**(४९) १०२२६५ (०३-०१-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना यासाठी उत्पन्नाची वार्षिक मर्यादा रु.२१,०००/- असल्याने अनेक निराधार व गरीब जनतेला या योजनेचा लाभ घेता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेंची उत्पन्नाची मर्यादा किमान रु.५०,०००/- पर्यत करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेणार आहे,
(३) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०२-२०१८) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) व (३) विशेष सहाय्य कार्यक्रमांतर्गतच्या सदरील योजनांमधील लाभार्थ्यांच्या वार्षिक उत्पन्न मर्यादेत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीमधील फुल बाजार बंद पडल्याबाबत**

**(५०) १०२७६१ (०३-०१-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीत सुरु करण्यात आलेला फुल बाजार उद्घाटनानंतर केवळ दोन दिवसांत बंद पडल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१६-०३-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) कोल्हापूर येथे विक्रीस येणाऱ्या शेतकऱ्यांच्या फूलांना योग्य भाव व काटेकोर वजनमाप होण्यासाठी कोल्हापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने श्री.शाहू मार्केट यार्ड या मुख्य बाजार आवारामध्ये दि.१८.९.२०१७ पासून फुलांचा बाजार सुरू केला होता. सदर ठिकाणी बाजार समितीकडून फुले विक्रीसाठी ओटे, इलेक्ट्रॉनिक वजनकाटे इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या या ठिकाणी आठ दिवस शेतकरी फुलांची विक्री करीत होते. तथापि, फुले खरेदी करणारे व्यापारी मार्केट यार्ड येथे येणेच बंद झाल्याने शेतकऱ्यांचा माल विक्री होऊ शकला नाही. याबाबत बाजार समितीमार्फत शेतकरी व व्यापारी यांना बाजार समिती आवारात फुलांचा बाजार सुरू करण्याबाबत विनंती केली. परंतु दोन्ही घटकांनी प्रतिसाद न दिल्याने कोल्हापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने श्री.शाहू मार्केट यार्ड मधील फुलांचा बाजार बंद करण्यात आला आहे.

याबाबत बाजार समितीकडून शेतकरी व व्यापारी या दोन्ही घटकांशी संपर्क साधण्यात आला असून शेतकरी हितसंवर्धन व व्यापारवृद्धीच्या दृष्टीने फुल बाजार, बाजार समिती आवारात नियमित चालू करण्यासाठी कोल्हापूर कृषी उत्पन्न बाजार समिती प्रयत्नशील आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.